**नि.दि.दा.क्र. ५९/२०१८**
**मनोज वि. प्रभाकर व इतर**
**नि.क्र.७३ पुढे सुरू**

**निशाणी क्र.८१ वरील आदेशानुसार प्रतिवादी क्र.४ यांच्या शपथेवर उलटपास प्रतिवादी क्र.२ व ३ तर्फे अधिवक्ता श्री.एस.एस.कश्यप यांच्या मार्फत :—**

**०४.** प्रस्तुतची केस ही वादीने त्यांच्या वडिलोपार्जित मिळकतीत हक्क मिळण्याबाबत दाखल केलेली आहे. हे म्हणने खरे आहे की, प्रस्तुतचे प्रकरण हे केवळ मनोज प्रभाकर पेटकर, प्रभाकर आनंदराव पेटकर, विकास प्रभाकर पेटकर, अनुप विकास पेटकर, विलास प्रभाकर पेटकर व स्वाती विलास कामडी यांच्यामध्ये आहे. हे म्हणने खरे आहे की, माझे वडिलांचे दोन भाउ व पाच बहिणी यांचे वडिलोपार्जित मिळकतीबाबात प्रस्तुतचा दावा आहे. हे म्हणने खरे आहे की, माझे आजोबाला दोन मुले व पाच मुली आहे. हे म्हणने खरे आहे की, दावा मिळकत ही आनंदराव यांची होती. हे म्हणने खरे आहे की, आनंदराव यांची मृत्युनंतर वरील सात इसम वारस म्हणून रेकॉर्डवर आले. हे म्हणने खरे आहे की, वरील सात ही लोकांनी दावा मिळकतीबाबत एग्रीमेंट जितेंद्र कामडी यांच्या सोबत केले होते व त्यानुसार विक्री पत्र ही करुन दिले होते. हे म्हणने खरे आहे की, वरील सात लोकांचे नाव प्रस्तुतच्या दावामध्ये नाही. हे म्हणने खरे आहे की, वरील सात लोकांना मी वर्धा येथील न्यायालयात प्रलंबित असलेल्या केसमध्ये पार्टी बनविलेले आहे.

**०५.** हे म्हणने खरे आहे की, मी निशाणी क्र.२३ हे दिनांक १९.०३.२०१९ रोजी दाखल केलेले शपथपत्रातील मजकूर निशाणी क्र.७३ दिनांक ३०.११.२०२४ रोजी दाखल केलेल्या शपथपत्रामध्ये नाही. याबाबत मला माहिती नाही की, माझी पत्नी व माझा मुलगा यांना माझे वडिल प्रभाकरराव यांनी बक्षीसपत्र करुन दिले होते. याबाबत मला माहिती नाही की, सिंदी येथे माझी पत्नी व मुलाच्या नावे घर आहे. हे म्हणने खरे आहे की, सिंदी येथे माझया भावाचा घर आहे. हे म्हणने खरे आहे की, न्यायालयात खोटी साक्ष देणे हे गुन्हा आहे.

**०६.** याबाबत मला माहिती नाही की, माझया आईवडिलांची प्रकृती ठिक नसतांना ते माझे मोठे भाउ यांच्याकडे नागपूरला राहत होते. हे म्हणने खरे आहे की, माझे आईवडिलांचे नागपूर येथे उपचार होत होते. याबाबत मला माहिती नाही की, उपचारादरम्यान माझया आईवडिलांची देखभाल विकास प्रभाकर पेटकर यांनी केली होती. हे म्हणने खरे आहे की, माझे आईवडिल त्यावेळी माझयाकडे राहत नव्हते. हे म्हणने खरे नाही की, विकास प्रभाकर पेटकर यांच्या वर खुश होउन माझे आईवडिलांनी त्यांच्या हिस्सयाची जमिन प्रतिवादी क्र.३ च्या नावे बक्षीसपत्राने दिली होती.

**०७.** हे म्हणने खरे आहे की, माझे वडिलांचा मृत्यु पॉइजन (विष) खाल्यामुळे झाली. हे म्हणने खरे आहे की, त्यावेळी ते सिंदी येथे होते. त्यावेळी ते तेथील भाडयाचा घरामध्ये राहत होते. सदरचे भाडयाचे घर हे ढेंगरे यांच्या नावाने होते. ढेंगरे व वादीच्या घरामध्ये साधारणत: अर्धा किलोमिटरचे अंतर आहे. याबाबत मला माहिती नाही की, माझया भावाने माझया वडिलांना भाडयाचा घरामध्ये ठेवले होते. हे म्हणने खरे आहे की, माझे वडिलांनी ज्या वेळी विष घेतले त्यावेळी मी व माझे भाउ नागपूरला होतो. साक्षीदार पुढे सांगतो की, भाउ कुठे होता याबाबत मला माहिती नाही परंतु मी नागपूरला होतो. याबाबत मला माहिती नाही की, माझा छोटा भाउ मनोज व त्यांची पत्नी मनिषा यांच्या मधील वाद झाल्यामुळे माझया वडिलांनी विष घेतले होते. हे म्हणने खरे आहे की, माझया वडिलांना विष कोणी दिले हे आज पर्यंत समजले नाही.

**<u>प्रतिवादी क्र.२ व ३ तर्फे अधिवक्ता श्री.एस.एस.कश्यप यांच्या तोंडी विनंतीवरुन पुढील उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.</u>**

**श्रवणोत्तर स्विकृत**

SHAILESH RAJENDRA SATBHAI

Digitally signed by SHAILESH RAJENDRA SATBHAI
Date: 2026.01.08 17:20:21 +0530

(एस.आर.सातभाई)

**दि.** ०८.०१.२०२६ दिवाणी न्यायाधीश, क.स्त. सेलू.